(चाल :-छोडदे सारी दुनिया किसी के लिए)

# भेद मानवी जीवनातला

लिहली नाही, कोणाच्या भाळावरी.
मग सांगाना ही, जात आली कुठून.
आलो जन्माला येथे माणूस म्हणून.
भेदभावाची ही बात आली कुठून. //धृ//
लिहली नाही कोणाच्या भाळावरी...

याची जात अशी, त्याची जात तशी, याचा धर्म असा त्याचा धर्म तसा.
त्या विधात्याने कुठल्याच गर्भावरी कोरली निशाणी मारला ना ठसा.
मानवी मनावर, कोणी पेरीले जहर.
आशा रोगाची ही साथ आली कुठून. //१//
लिहली नाही कोणाच्या भाळावरी...

देव धर्माचे जातीचे, ढोंग ते रचून, माणसाला माणसाशी लढवी कुणी.
मिच श्रेष्ठ ऊच्च कुळाचा आहे, ढोल आपल्याच धर्माचे बडवी कुणी.
कृत्य दानवी करी हे अमानवी करी.
आशी लढवित अपसात आली कुठून. //२//
लिहली नाही कोणाच्या भाळावरी...

शोधली का तुझी तू वंशावळी,असे बापाचे ते बाप झाले किती.
धर्म मानवता आहे एकच खरा, असे सांगाया शिकवाया आले किती.
गुरुने बोधीले, ज्ञान समजाविले.
समज ही तेंव्हा एकनाथ आली कुठून. //३//
लिहली नाही कोणाच्या भाळावरी...

गीतकार- एकनाथ कांबळे.